**<u>सत्र खटला क्र. ४६/२०२५</u>**

सरकार –वि– शेख लाल

**निशाणी क्र. १३**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | शांताराम गोविंद हिवाळे |
| वय | – | ६४ वर्षे |
| पदनाम | – | सेवानिवृत्त |
| राहणार | – | सुंदरखेड, बुलडाणा, ता. जि. बुलडाणा. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्री. केसाळे यांचे मार्फत –</u>**

दिनांक १०/०८/२०१८ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते हे मला आठवत नाही. मला पंचनाम्याबाबत काहीही माहिती नाही. आता मला अभिलेखावरुन घटनास्थळ पंचनामा दाखविला, हा तोच आहे, त्यावर माझी आणि दोन पंचांच्या सह्या आहेत, त्यामधील मजकूर मला माहिती नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला **<u>निशाणी क्र. १४</u>** देण्यात येते.

**<u>सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने, स. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची तोंडी विनंती केली. विनंती मान्य परवानगी देण्यात येते –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि दुसरा पंच जगराम पवार यांना पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनास्थळ नगर परिषद कार्यालय, बुलडाणा होते. हे मला आठवत नाही की, सदर घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे कार्यालयातील एक खोली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा तयार केला आणि तेथे माझ्या पंचनाम्यावर सह्या घेतल्या. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, केस कशाबद्दल आहे हे मला माहिती नाही.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. जावेद शेख यांनी नाकारला.**

दि. १३/११/२०२५ समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा